सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३

# महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम, २०१३

(दिनांक २६ जानेवारी, २०१६ पर्यंत सुधारित)

**Maharashtra Act No. XXIII of 2013**

# Maharashtra State Board of Nursing and Paramedical Education Act, 2013

**(As modified upto the 26th January, 2016)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१५

(किंमत : रुपये ३५.००)

**सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३**

# महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम, २०१३

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**

**कलमे**


**प्रकरण एक**

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ

२. व्याख्या

**प्रकरण दोन**

**मंडळ व नियामक परिषद यांची स्थापना व रचना**

३. मंडळाची स्थापना

४. मंडळाचे विधिसंस्थापन

५. मंडळाची रचना

६. मंडळाचा संचालक

७. मंडळाच्या सदस्यांचा पदावधी व त्यांचे भत्ते

८. नियामक परिषदेची स्थापना

९. मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांची अनर्हता

१०. नैमित्तिक रिक्त पदे

११. सदस्याचा राजीनामा

१२. सदस्यास काढून टाकणे

१३. मंडळाच्या बैठकी

१४. अनर्ह ठरविल्यामुळे अध्यक्षांचे किंवा सदस्यांचे पद रिक्त होणे

१५. परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यामुळे सदस्याचे पद रिक्त होणे

१६. रिक्त पदाबाबतच्या प्रश्नाचा निर्णय

१७. मंडळातील किंवा समितीतील रिक्त पदांमुळे किंवा रचनेतील दोषामुळे कृती किंवा कार्यवाही विधिअग्राह्य न होणे.

**अनुक्रमणिका--**चालू

१८. तज्ज्ञांना आणि अधिकाऱ्यांना बैठकीस बोलविण्याचा अधिकार

१९. समित्यांची रचना

२०. मंडळाने विवक्षित कर्मचारीवर्ग सामावून घेणे व हा अधिनियम लागू असेल अशा गोष्टीसंबंधीची शासनाची दायित्वे स्वीकारणे.

२१. प्रबंधक, सह-प्रबंधक, सहायक प्रबंधक, परीक्षा नियंत्रक, व्यवस्था विश्लेषक, वित्त अधिकारी व लेखा अधिकारी यांची नेमणूक, अधिकार व कर्तव्ये.

२२. मंडळाचे इतर अधिकारी आणि कर्मचारी

**प्रकरण तीन**

**नियामक परिषद व मंडळ यांचे अधिकार व कर्तव्ये**

२३. नियामक परिषदेचे अधिकार व कर्तव्ये

२४. मंडळाचे अधिकार व कर्तव्ये

२५. मंडळाच्या अध्यक्षांचे अधिकार व कर्तव्ये

२६. निदेश देण्याचे शासनाचे अधिकार

**प्रकरण चार**

**परवानगी, संलग्नीकरण, स्वायत्त दर्जा व समतुल्यता प्रदान करणे**

२७. संलग्नीकरणाच्या शर्ती

२८. परवानगी देण्याची कार्यपद्धती

२९. संलग्नता देण्याची कार्यपद्धती

३०. संलग्नता पुढे चालू ठेवणे

३१. संलग्नता देणे

३२. कायमस्वरूपी संलग्नता आणि मान्यता

३३. संस्थेची तपासणी करणे व अहवाल देणे

३४. संलग्नता किंवा मान्यता काढून घेणे

३५. संस्था बंद करणे

**प्रकरण पाच**

**निधी, वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा**

३६. मंडळाच्या मत्तांचे उपयोजन

३७. मंडळाचा निधी, त्याची अभिरक्षा आणि गुंतवणूक

३८. निधीचा सर्वसाधारण वापर

३९. वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे
४०. वार्षिक लेखे व लेखापरीक्षा
४१. तपासणी व चौकशी
४२. मंडळाने पुरवावयाची माहिति, विवरणे इत्यादी

**प्रकरण सहा**

## पूरक व संकीर्ण तरतुदी

४३. समितीकडे सोपविलेल्या अधिकारांचा वापर करण्याची रीत
४४. विनियम करण्याचे मंडळाचे अधिकार
४५. पहिले विनियम
४६. उपविधी करण्याचा मंडळाचा अधिकार
४७. शंका उपस्थित होईल त्याबाबतीत अर्थ उकल
४८. पदविकास्तरीय शुश्रूषा संस्थांची कर्तव्ये व त्यांचे साहाय्य
४९. सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीचे संरक्षण
५०. मंडळाचे सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी लोकसेवक असणे
५१. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याची सुधारणा
५२. निरसन
५३. अडचणी दूर करण्याचा अधिकार

---

## सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३

# महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम, २०१३

[ माननीय राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २१ ऑगस्ट २०१३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम ]

**महाराष्ट्र राज्यातील पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यक शिक्षणासंबंधीच्या बाबींचे नियमन करण्यासाठी राज्य मंडळाची स्थापना करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यक शिक्षणासंबंधीच्या बाबींचे नियमन करण्यासाठी राज्य मंडळाची स्थापना करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौसष्टाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

एक प्रकरण

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम, २०१३ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) हे कलम ताबडतोब अमलात येईल आणि या अधिनियमाच्या उर्वरित तरतुदी, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अमलात येतील.

व्याख्या

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, —

(क) "नियत दिनांक" याचा अर्थ, ज्या दिनांकास या अधिनियमाचे कलम १ खेरीज करून अन्य उर्वरित तरतुदी, कलम १ च्या पोट-कलम (३) अन्वये अमलात येतील असा दिनांक, असा आहे;

(ख) "मंडळ" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन केलेले मंडळ, असा आहे ;

(ग) "उपविधी" याचा अर्थ, कलम ४६ अन्वये मंडळाने केलेले उपविधी, असा आहे ;

(घ) "महाविद्यालय किंवा विद्यालय" याचा अर्थ, या अधिनियमान्वये मंडळाने मान्यता दिलेल्या रुग्णालय प्रशासन व व्यवस्थापन यामधील किंवा शुश्रूषा व परावैद्यक शिक्षणामधील पदविका किंवा पदव्युत्तर पदविका किंवा प्रगत पदविका देणारी संस्था, असा आहे ;

(ङ) "पदविकास्तरीय शिक्षण" याचा अर्थ, पदवी पाठ्यक्रम व पदव्युत्तर पदविका वगळता, सुधारित साह्यकारी परिचारिका प्रसूतिशास्त्र, सुधारित सामान्य शुश्रूषा प्रसूतिशास्त्र व प्रमाणपत्रोत्तर पदविका पाठ्यक्रमांचा आणि परावैद्यक पाठ्यक्रमांचा किंवा रुग्णालय प्रशासन व व्यवस्थापन अंगीकार करणारे किंवा मंडळाने विनिर्दिष्ट केलेले इतर कोणतेही शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण, असा आहे ;

(च) "संचालक" याचा अर्थ, कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेला, मंडळाचा संचालक, असा आहे ;

(छ) "परीक्षा" याचा अर्थ, मंडळाने घेतलेली एक किंवा अनेक परीक्षा, असा आहे ;

(ज) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(झ) "नियामक परिषद" याचा अर्थ, कलम ८ अन्वये स्थापन केलेली मंडळाची नियामक परिषद, असा आहे ;

(ञ) "संस्था प्रमुख" किंवा "प्राचार्य" याचा अर्थ, शुश्रूषा व परावैद्यक पदविकास्तरीय संस्था किंवा महाविद्यालय किंवा विद्यालय मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, यांच्या अध्यापकवर्गाचा प्रमुख, असा आहे ;

(ट) "परावैद्यक शिक्षण" याचा अर्थ, त्या त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्या अन्वये स्थापन केलेल्या कोणत्याही विद्यापीठाने किंवा शासनाने मान्यता दिलेल्या इतर कोणत्याही संस्थेने, महाविद्यालयाने किंवा विद्यालयाने दिलेली कोणत्याही परावैद्यक पात्रतेची कोणतीही पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, असा आहे ;

(ठ) "विहित" या अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या विनियमांद्वारे विहित करण्यात आलेले, असा आहे ;

(ड) "प्रदेश" याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तीनही प्रदेशांपैकी प्रत्येक प्रदेशामध्ये समाविष्ट असलेले क्षेत्र, असा आहे ;

(ढ) "प्रबंधक" याचा अर्थ, मंडळाचा प्रबंधक, असा आहे ;

(ण) "विनियम" याचा अर्थ, शासनाने कलम ४५ अन्वये आणि मंडळाने कलम ४४ अन्वये केलेले विनियम, असा आहे ;

(त) "अध्यापक" याचा अर्थ, प्राचार्य किंवा संस्थेचा प्रमुख वगळून शुश्रूषा व परावैद्यक अध्यापकवर्गाचा सदस्य, असा आहे.

## प्रकरण दोन

## मंडळ व नियामक परिषद यांची स्थापना व रचना

मंडळाची स्थापना.

**३.** शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, "महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ" या नावाने संबोधण्यात येणारे एक मंडळ स्थापन करील.

मंडळाचे विधिसंस्थापन.

**४.** मंडळ हे, अखंड परंपरा असलेला व सामाईक मोहोर असलेला एक निगमनिकाय असेल आणि त्याला संविदा करण्याचा आणि जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिचा विनियोग करण्याचा आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल आणि त्याच्या निगम नावाने त्याला किंवा त्याच्यावर दावा दाखल करता येईल.

मंडळाची रचना **५.** (१) मंडळात पुढील व्यक्तींचा समावेश असेल,—

(क) अध्यक्ष म्हणून मंडळाचा संचालक :

परंतु, कलम ६ अन्वये संचालकाची नियुक्ती होईपर्यंत, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य हा अध्यक्षाचा कार्यभार सांभाळील ;

(ख) सदस्य म्हणून राज्य शुश्रूषा अधीक्षक ;

(ग) सदस्य-सचिव म्हणून प्रबंधक ; आणि

(घ) सदस्य म्हणून संचालक, शिक्षु प्रशिक्षण मंडळ (पश्चिम विभाग), भारत सरकार, मानव संसाधन विकास मंत्रालय ;

(ङ) पुढील सदस्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील :—

**(क)** राज्यातील शासकीय शुश्रूषा महाविद्यालयांमधून एक प्राचार्य ;

**(ख)** संस्थांचे प्राचार्य आणि प्रमुख यांच्यामधून दोन सदस्य, यांपैकी एक सदस्य हा शासकीय संस्थेतील असेल आणि दुसरा सदस्य हा महानगरपालिकेच्या संस्थेतील असेल आणि यापैकी किमान एक सदस्य ही महिला असेल ;

**(ग)** वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आणि आरोग्य सेवा संचालनालय यांच्या अंतर्गत असणारे शासकीय पदविका महाविद्यालय किंवा विद्यालय यांच्या अध्यापकांमधून दोन सदस्य, यापैकी एक सदस्य शुश्रूषा अध्यापकांमधून असेल आणि दुसरा सदस्य हा परावैद्यक अध्यापकांमधून असेल ;

**(घ)** प्रत्येक प्रदेशाचा एक प्रतिनिधी, ज्याने शुश्रूषा किंवा परावैद्यक शिक्षणामधील पदव्युत्तर पदवी ही किमान अर्हता धारण केली असेल आणि त्याला अशा क्षेत्रामधील किमान पाच वर्षांचा अनुभव असेल ;

परंतु, एखादी व्यक्ती, ज्या आधारे अशा व्यक्तीची अशा प्रकारे नियुक्ती करण्यात आली असेल ते पद, पदनाम किंवा यथास्थिति, अधिकारपद धारण करण्याचे बंद करील तर, अशी व्यक्ती, मंडळाचा सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल आणि अशी व्यक्ती, तो मंडळाचा सदस्य असल्याचे बंद झाल्यापासून एक आठवड्याच्या आत मंडळाच्या अध्यक्षास लेखी कळवील.

(२) पदसिद्ध सदस्य वगळता ज्यांना मंडळाचे सदस्य म्हणून वेळोवेळी नामनिर्देशित करण्यात आले असेल अशा व्यक्तींची नावे शासनाकडून राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.

मंडळाचा संचालक. **६.** (१) मंडळाचा एक संचालक असेल, त्यांची नियुक्ती, शासनाच्या वैद्यकीय शिक्षण संचालक म्हणून नियुक्ती करण्यास अर्हता प्राप्त असलेल्या व्यक्तींमधून शासनाकडून करण्यात येईल आणि त्याचे नाव शासनाकडून राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) संचालक, राजपत्रात त्याचे नाव प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या अवधीसाठी पद धारण करील.

(३) लोक सेवेच्या निकडीनुसार, अशा अवधीत, शासनाच्या अधिपत्याखालील इतर कोणत्याही पदावर, संचालकाची बदली करण्यात शासनाच्या अधिकारावर पोट-कलम (२) मधील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही ; आणि जर संचालक नियत सेवावधीनुसार शासकीय सेवेतून निवृत्त झाला असेल आणि जर त्याची सेवा वाढविली नसेल किंवा त्याला शासकीय सेवेत पुनर्नियुक्त केले नसेल किंवा इतर कोणत्याही पदावर त्याची बदली केलेली नसेल तर, तो संचालक असण्याचे बंद होईल.

(४) शासनास, मंडळाच्या संचालकाच्या पदावधीत वेळोवेळी वाढ करता येईल, मात्र अशा प्रकारे वाढविलेला एकूण अवधी हा दहा वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

(५) संचालक, हा शासनाच्या वैद्यकीय शिक्षण संचालकांच्या पदाशी समकक्ष असलेला एक शासनाचा कर्मचारी असेल आणि संचालकाच्या सेवाशर्ती आणि त्याचे सेवाप्रवेश नियम हे, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन याच्या सेवाप्रवेश नियमाप्रमाणेच असतील.

(६) रजा, आजारपण यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे संचालकाचे पद तात्पुरते रिक्त होईल त्याबाबतीत शासनास समकक्ष पद धारण करणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीची संचालक म्हणून नियुक्ती करता येईल.

मंडळाच्या सदस्यांचा पदावधी व त्यांचे भत्ते.

**७.** (१) मंडळाच्या पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्य, ज्या दिनांकास त्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध झाली असतील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करतील.

(२) मावळत्या सदस्यांचा पदावधी हा त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांची नावे ज्या दिनांकास राजपत्रात प्रसिद्ध झाली असतील त्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या दिवसांपर्यंत चालू राहील व त्या दिनांकास संपेल.

(३) पद्सिद्ध सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्य, विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील असे पूरक भत्ते मिळण्यास हक्कदार असतील.

नियामक परिषदेची स्थापना.

८. (१) शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियामक परिषद स्थापन करील. ही परिषद राज्य पातळीवरील पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण व परीक्षाविषयक बाबींचे नियंत्रण आणि संनियंत्रण करणारी एक शिखर संस्था असेल.

(२) नियामक परिषदेत पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

| | |
|---|---|
| (एक) वैद्यकीय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य | .. अध्यक्ष |
| (दोन) वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | .. उपाध्यक्ष |
| (तीन) महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाचा सचिव किंवा प्रधान सचिव किंवा यथास्थिति, अपर मुख्य सचिव. | .. सदस्य |
| (चार) महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाचा सहसचिव किंवा उपसचिव. | .. सदस्य |
| (पाच) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन | .. सदस्य |
| (सहा) संचालक, आरोग्य सेवा | .. सदस्य |
| (सात) संचालक, आयुर्वेद | .. सदस्य |

(आठ) अधीक्षक, राज्य शुश्रूषा .. सदस्य

(नऊ) प्राचार्य, शासकीय व्यवसायोपचार व भौतिकोपचार महाविद्यालय, नागपूर. .. सदस्य

(दहा) मंडळाचा संचालक .. सदस्य सचिव

(३) एका वर्षात दर तीन महिन्यांत नियामक परिषदेची बैठक होईल.

मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांची अनर्हता.

**९.** एखादी व्यक्ती ही पुढील बाबतीत तिला मंडळाचा किंवा या अधिनियमान्वये घटित केलेल्या कोणत्याही समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्त केले जाण्यास किंवा नामनिर्देशित केले जाण्यास किंवा असा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास अनर्ह ठरेल —

(क) जर मंडळाच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा मंडळाच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत ती प्रत्यक्षपणे सहभागी झाली असेल किंवा त्यात तिचा कोणताही हितसंबंध असेल तर;

(ख) कलम १२ अन्वये जिला पदावरून काढून टाकण्याचा आदेश काढण्यात आला असेल तर;

परंतु जिच्याविरुद्ध असा आदेश काढण्यात आला असेल अशा व्यक्तीला पदावरून काढून टाकण्यात आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षे किंवा शासन विनिर्दिष्ट करील असा कमी कालावधी लोटलेला असेल तर तिला या खंडान्वये अनर्ह ठरविण्यात आले असल्याचे मानण्यात येणार नाही.

नैमत्तिक रिक्त पदे.

**१०.** मंडळ नियामक परिषद किंवा मंडळाने घटित केलेली कोणतीही समिती यांच्या सदस्यांची सर्व नैमत्तिक रिक्त पदे, नामनिर्देशनाद्वारे किंवा यथास्थिति, नेमणुकीद्वारे शक्य तितक्या लवकर भरण्यात येतील; आणि त्या नैमत्तिक रिक्त पदावर नामनिर्देशन किंवा नेमणूक करण्यात आलेली व्यक्ती, ज्या सदस्याच्या जागी तिचे नामनिर्देशन किंवा नेमणूक झालेली असेल त्या सदस्याचे पद रिक्त झाले नसते, तर त्याने जोपर्यंत ते पद धारण केले असते तोपर्यंत ते पद धारण करील.

सदस्याचा राजीनामा.

**११.** मंडळाच्या पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त अन्य सदस्यास, मंडळाच्या अध्यक्षाकडे किंवा यशास्थिति नियामक परिषदेच्या अध्यक्षाकडे लेखी राजीनामा देऊन कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देता येईल; आणि असा राजीनामा शासनाला मिळाला आणि तो शासनाने स्वीकृत केल्याबरोबर अशा सदस्याने आपले पद रिक्त केले आहे असे मानण्यात येईल.

सदस्यास काढून टाकणे.

**१२.** (१) शासनास मंडळाच्या शिफारशीवरून आणि त्यास आणखी कोणतीही चौकशी करणे योग्य वाटले तर तशी चौकशी केल्यानंतर आदेशाद्वारे मंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या कोणत्याही सदस्यास पुढील कारणांवरून काढून टाकता येईल :—

(क) अशा सदस्यांस नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल भारतातील न्यायालयाने सिद्धपराध ठरविलेले असेल; किंवा

(ख) असा सदस्य अमुक्त नादार असेल; किंवा

(ग) शासन विनिर्दिष्ट करील अशा वैद्यकीय प्राधिकरणाने अशा सदस्याला पदविशिष्ट कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झालेली व्यक्ती म्हणून घोषित केले असेल आणि मंडळाची किंवा यथास्थिति, समितीची कार्य पार पाडण्यास सक्षम नसल्याचे प्रमाणित केले असेल; किंवा

(घ) असा सदस्य विकल मनाचा असून सक्षम न्यायालयाने तो तसा असल्याचे घोषित केले असेल; किंवा

(ङ) असा सदस्य, मंडळाच्या ध्येयांना व उद्दिष्टांना हानिकारक ठरेल अशा रीतीने वागत असेल :

परंतु अशी शिफारस का करण्यात येऊ नये किंवा असा आदेश का काढण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी त्याला देण्यात आली असल्याखेरीज, मंडळ अशी कोणतीही शिफारस करणार नाही किंवा खंड (ङ) अन्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) शासनाच्या मते मंडळाच्या किंवा त्याच्या समितीच्या कोणत्याही नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही सदस्याची कृती, मंडळाचे किंवा त्याच्या कोणत्याही समितीचे कार्य योग्यरीतीने चालण्यास हानिकारक ठरत असेल किंवा त्यात अडथळा आणत असेल, अशा सदस्यास शासनास आदेशाद्वारे स्वत:हून काढून टाकता येईल;

परंतु, कोणत्याही सदस्याला त्याच्याविरुद्ध असा आदेश का काढण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आली असल्याखेरीज त्याला पदावरून काढून टाकण्यात येणार नाही.

(३) पोट-कलमे *(१)* व *(२)* यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी मंडळाचा नामनिर्देशित सदस्य शासनाची मर्जी असेतोपर्यंत पद धारण करील आणि त्याचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यास पदावरून काढून टाकता येईल.

मंडळाच्या बैठकी.

**१३.** (१) मंडळाच्या, प्रत्येक महिन्यात किमान दोन बैठकी होतील.

(२) मंडळाच्या अध्यक्षास, निकडीच्या कारणामुळे तशी आवश्यकता असल्यास, मंडळाच्या एकूण सदस्यांपैकी एक-तृतीयांशाहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी लेखी विनंती केली असता, अध्यक्षाला अशी विनंती मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांपेक्षा नंतरचा नसेल अशा दिनांकास मंडळाची विशेष बैठक बोलवता येईल.

अनर्ह ठरविल्यामुळे अध्यक्षांचे किंवा सदस्यांचे पद रिक्त होणे.

**१४.** मंडळाचा किंवा त्याच्या कोणत्याही समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य यास कलम ९ मध्ये नमूद केलेल्या अनर्हतांपैकी कोणत्याही अनर्हतेस पात्र ठरला असेल, तर शासन त्याचे पद रिक्त म्हणून जाहीर करील.

परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यामुळे सदस्याचे पद रिक्त होणे.

**१५.** मंडळावरील नियुक्त किंवा नामनिर्देशित सदस्य मंडळाच्या परवानगीशिवाय मंडळाच्या लागोपाठ तीन बैठकींना अनुपस्थित राहिला तर, त्याचे पद रिक्त होईल आणि ते पद रिक्त झाल्याचे अध्यक्षाकडून घोषित करण्यात येईल.

रिक्त पदाबाबतच्या प्रश्नाचा निर्णय.

**१६.** अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद कलम १४ किंवा १५ अन्वये रिक्त झाले आहे किंवा कसे याबाबत कोणतीही विवाद उद्भवल्यास तो विवाद शासनाकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल आणि त्याबाबतीत शासनाचा निर्णय अंतिम असेल.

मंडळातील किंवा समितीतील रिक्त पदांमुळे किंवा रचनेतील दोषामुळे कृती किंवा कार्यवाही विधीअग्राह्य न होणे.

**१७.** मंडळाची किंवा त्याच्या कोणत्याही समितीची कोणतीही कृती किंवा कामकाज हे, अशा मंडळामध्ये किंवा समितीमध्ये कोणतेही पद रिक्त होते किंवा अशा मंडळाच्या किंवा समितीच्या रचनेमध्ये दोष होता याच केवळ कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही.

तज्ज्ञांना आणि अधिकाऱ्यांना बैठकीस बोलविण्याचा अधिकार.

**१८.** मंडळास त्यांच्या मते जी व्यक्ती शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ असेल अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास ती तज्ज्ञ व्यक्ती किंवा तो अधिकारी ज्या विषयाशी संबंधित असेल तो विषय जर मंडळाच्या किंवा त्याच्या समितीच्या बैठकीत चर्चेसाठी येण्याचा किंवा विचारार्थ मांडला जाण्याचा संभव असेल, तर तज्ज्ञाला किंवा अधिकाऱ्याला अशा बैठकीला उपस्थित राहण्यासाठी निमंत्रित करता येईल.

समित्यांची रचना.

**१९.** (१) मंडळाद्वारे पुढील समित्यांची रचना करण्यात येईल :—

(क) विद्या समिती ;

(ख) वित्त समिती ;

(ग) पाठ्यक्रम समित्या, ज्या २० पेक्षा अधिक नसतील ;

(घ) समतुल्यता समिती ;

(ङ) विशेष समिती.

(२) मंडळास त्याची कार्ये कार्यक्षमरित्या पार पाडण्याकरिता त्याला आवश्यक वाटतील अशा इतर समित्यांची रचना करता येईल.

(३) मंडळाकडून रचना करण्यात आलेल्या प्रत्येक समितीच्या सदस्यांची संख्या, तिच्या सदस्यांचा पदावधी व तिने पार पाडावयाची कर्तव्ये व कार्ये विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

मंडळाने विवक्षित कर्मचारीवर्ग सामावून घेणे व हा अधिनियम लागू असेल अशा गोष्टींसंबंधीची शासनाची दायित्वे स्वीकारणे.

**२०.** (१) मंडळाच्या स्थापनेच्या दिनांकास महाराष्ट्र शुश्रूषा अधिनियम, १९६६ या अन्वये घटित करण्यात आलेल्या महाराष्ट्र शुश्रूषा परिषदेच्या (यात यापुढे जिचा निर्देश "विद्यमान परिषद" असा करण्यात आला आहे.) तिच्या प्रयोजनार्थ कार्यरत असलेला प्रबंधक, सह प्रबंधक, उपप्रबंधक आणि सहायक प्रबंधक, परीक्षा नियंत्रक, व्यवस्था विश्लेषक, वित्त अधिकारी व लेखा अधिकारी यासारख्या विद्यमान कर्मचारीवर्गापैकी राज्य शासन निदेश देईल अशा कर्मचारीवर्गाला मंडळ आपल्याकडे सामावून घेईल आणि सेवानियुक्त करील आणि अशा प्रकारे मंडळाकडे सामावून घेण्यात आलेली आणि सेवानियुक्त केलेली प्रत्येक व्यक्ती ही, या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या विनियमांच्या तरतुदींच्या अधीन असेल :

१९६६ चा महा. ४०.

परंतु —

(क) असा कर्मचारीवर्ग विहित कालमर्यादेत मंडळाच्या सेवेमध्ये कायम राहण्याचा विकल्प देईल ;

(ख) अशा नियुक्तींच्या कालावधीमध्ये उक्त कर्मचारीवर्गाच्या सदस्यांचे वेतन, रजा, सेवानिवृत्ती, भत्ते, निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी यासंबंधीच्या सर्व बाबींचे व त्यांच्या इतर सेवाविषयक शर्ती यांचे नियमन महाराष्ट्र नागरी सेवा नियम किंवा शासनाकडून वेळोवेळी देण्यात येईल अशा आदेशानुसार करण्यात येईल ;

(ग) अशा कोणत्याही कर्मचाऱ्याला, फेटाळणी, बडतर्फ करणे किंवा सेवेतून काढून टाकणे, द्रव्यदंडाची किंवा इतर कोणतीही शिक्षा याबद्दलच्या आदेशांविरुद्ध शासनाकडे अपील करण्याचा अधिकार असेल.

(२) विद्यमान परिषदेच्या स्थायी कर्मचाऱ्यांनी जर शासकीय सेवेचा विकल्प दिला तर, त्यांना दोन वर्षांच्या कालवधीच्या मुदतीत वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत जेथे रिक्त पद असेल अशा वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाअंतर्गत कोणत्याही कार्यालयामध्ये किंवा महाविद्यालयामध्ये किंवा शुश्रूषा विद्यालयामध्ये किंवा शासकीय रुग्णालयामध्ये सामावून घेण्यात येईल.

(३) ज्या उद्देशाकरिता व प्रयोजनांकरिता मंडळाची रचना करण्यात आली असेल, त्या विद्यमान परिषदेच्या कोणत्याही प्रयोजनाच्या संबंधात नियत दिनांकापूर्वी विद्यमान परिषदेने केला असेल असा सर्व खर्च त्या दिनांकाला शासनाने मंडळाला दिलेला भांडवली खर्च असल्याचे मानण्यात येईल आणि असा खर्च करून प्राप्त केलेली सर्व मत्ता मंडळाकडे निहित होईल.

(४) मंडळाचे उद्देश व प्रयोजने साध्य करण्यासाठी, विद्यमान परिषदेची आवश्यक ती सर्व जंगम किंवा स्थावर मालमत्ता आणि सर्व हक्क आणि कोणत्याही प्रकारचे हितसंबंध आणि अधिकार व विशेषाधिकार मंडळाकडे हस्तांतरित व निहित होतील व ज्या उद्देशाकरिता आणि प्रयोजनाकरिता मंडळाची रचना करण्यात आली आहे त्यासाठी त्यांचा वापर करण्यात येईल.

(५) महाराष्ट्र राज्यातील शुश्रूषा व परावैद्यक शिक्षणाच्या प्रचालनाबद्दलच्या कोणत्याही योजनेच्या संबंधात या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनाकरिता मंडळाची प्रथमत: स्थापना होण्यापूर्वी राज्य शासनाने किंवा विद्यमान परिषदेने राज्य शासनाची किंवा विद्यमान परिषदेशी अथवा शासनाकरिता किंवा विद्यमान परिषदेकरिता पत्करलेली सर्व आबंधने केलेले सर्व करार आणि करण्याचे वचन मिळालेल्या इतर सर्व बाबी वा गोष्टी या मंडळाने पत्करल्याचे मंडळाशी करण्यात आल्याचे किंवा मंडळाकरिता करण्याचे वचन मिळाल्याचे समजण्यात येईल आणि त्यानुसार राज्य शासनाकडून किंवा यथास्थिति, विद्यमान परिषदेकडून किंवा त्याविरुद्ध दाखल करण्यात आलेले किंवा दाखल करण्यात आले असते असे सर्व दावे किंवा वाद किंवा कायदेशीर कार्यवाही मंडळाकडून किंवा मंडळाविरुद्ध पुढे चालू ठेवण्यात येतील किंवा दाखल करण्यात येईल.

प्रबंधक, सहप्रबंधक, उपप्रबंधक, सहायक प्रबंधक, परीक्षा नियंत्रक, व्यवस्था विश्लेषक, वित्त अधिकारी व लेखा अधिकारी यांची नेमणूक अधिकार व कर्तव्ये.

**२१.** (१) मंडळाचा एक प्रबंधक असेल. त्याची नेमणूक शासनाकडून करण्यात येईल.

(२) अध्यक्षाच्या नियंत्रणाच्या अधीन राहून, प्रबंधक हा मंडळाचा कार्यकारी अधिकारी असेल आणि त्या त्या वेळी मंडळाच्या सेवेत कार्यरत असलेले इतर सर्व अधिकारी व कर्मचारी त्याला दुय्यम असतील.

(३) प्रबंधक मंडळाच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी हक्कदार असेल आणि तो मंडळाचा सदस्य-सचिव असेल.

(४) प्रबंधक विनियमाद्वारे करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(५) शासन, मंडळाच्या शिफारशीवरून मंडळाकरिता सहप्रबंधक, उपप्रबंधक व सहायक प्रबंधक, परीक्षा नियंत्रक, व्यवस्था विश्लेषक, वित्त अधिकारी व लेखा अधिकारी यांसारखे शुश्रूषा व परावैद्यक शिक्षणासंबंधीचा आवश्यक तो कर्मचारी वर्ग नियुक्त करील.

(६) सहप्रबंधक, उपप्रबंधक व सहायक प्रबंधक, परीक्षा नियंत्रक, व्यवस्था विश्लेषक, वित्त अधिकारी व लेखा अधिकारी हे प्रबंधकाकडून सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये त्यांना अनुक्रमे नेमून दिलेले असतील अशा अधिकारांचा वापर करतील व अशी कर्तव्ये पार पाडतील.

(७) या अधिनियमान्वये नियुक्त केलेले प्रबंधक, सहप्रबंधक, उपप्रबंधक व सहायक प्रबंधक, परीक्षा नियंत्रक, व्यवस्था विश्लेषक, वित्त अधिकारी व लेखा अधिकारी हे राज्य शासनचे कर्मचारी असतील आणि या अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती, शासनाकडून निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

मंडळाचे इतर अधिकारी आणि कर्मचारी.

**२२.** (१) मंडळास शासनाच्या मान्यतेने या अधिनियमाखालील आपली कार्ये सक्षम रितीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी नेमता येतील.

(२) पोट-कलम *(१)* अन्वये नेमलेले अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती या विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण तीन

## नियामक परिषद व मंडळ यांचे अधिकार व कर्तव्ये

नियामक परिषदेचे अधिकार व कर्तव्ये

**२३.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने नियामक परिषदेचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) मंडळाकडून निर्णयार्थ सोपविण्यात आलेल्या बाबींवर कार्यवाही करणे आणि अंमलबजावणीसाठी मंडळाच्या शिफारशी आणि त्याचे निर्णय यांना मान्यता देणे ;

(ख) शिक्षण संस्थांशी विचारविनियम करून परिचारिका व रुग्णालय यांच्याकरिता यथार्थदर्शी विकास योजना तयार करणे ;

(ग) कर्मचारीवर्गाचे विनियम व त्यांना मान्यता देणे या संबंधित बाबी मान्य करणे ;

(घ) मंडळाच्या लेख्यांची नियमितपणे आणि नियामक परिषदेस योग्य वाटेल अशा कालातरांने चाचणी दाखल लेखापरीक्षा करण्यासाठी शासनाकडे शिफारस करणे ;

(ङ) मंडळाने निर्देशित केलेल्या असतील अशा वित्तीय बाबींशी संबंधित अधिकारांचा वापर करणे ;

(च) मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे ;

(छ) शासनाने वेळोवेळी घेतलेल्या विभिन्न धोरणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीसंबंधात मंडळाला निदेश देणे ;

(ज) मंडळाच्या प्रबंधक आणि इतर कर्मचारी यांची नियुक्ती, याबद्दल जशी त्यांची अर्हता, वर्तणूक, शिस्त यासह सेवेच्या अटी व शर्ती आणि कर्तव्ये, सेवा प्रवेशाची पद्धत, वेतनश्रेणी इत्यादींबद्दलच्या नियमांना आणि कार्यपद्धतींना मान्यता देणे ;

(झ) मंडळांतर्गत संस्थांची उचित वर्तणूक, कामकाज आणि वित्त व्यवस्था यांसंबंधीच्या कोणत्याही बाबींच्या संबंधातील चौकशी करण्यासाठी शासनाकडे शिफारस करणे.

मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

**२४.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, मंडळाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) सर्वसाधारणपणे पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यक शिक्षणविषयक धोरणात्मक बाबींबर आणि विशेषत: पुढील बाबींवर शासनाला सल्ला देणे म्हणजे :—

(एक) पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यक शिक्षणासंबंधीचे राष्ट्रीय धोरण आणि राज्य धोरण यांचे समन्वयन करणे ;

(दोन) पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण यांचे समन्वयन करणे ;

(तीन) पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण यांच्या दर्जामध्ये एकरूपता राखणे ;

(चार) आरोग्यसेवा उद्योग आणि शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण संस्था यांच्यामधील परस्परसंबंधास चालना देणे ;

(ख) अभ्यासक्रम आणि पाठ्यक्रम निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे घालून देणे; आणि पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यक शिक्षणाकरिता नियमित, सेवांतर्गत, अंशकालिक, पत्रव्यवहाराद्वारे पाठ्यक्रम, वार्षिक, सहामाही पद्धती आणि तत्सम पद्धती यासारख्या सर्व प्रवर्गाकरिता सविस्तर अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करणे ;

(ग) शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण संस्थांकरिता पायाभूत सुविधांची निवड, कर्मचारीवर्ग, इमारती, फर्निचर, साधनसामग्री, लेखनसामग्री व इतर आवश्यक गोष्टी याबाबतची आवश्यकता आणि पदविकास्तरीय पाठ्यक्रमांसाठी आवश्यक असलेल्या इतर गोष्टी याकरिता प्रमाणभूत मार्गदर्शक तत्त्वे विहित आणि विनियमित करणे ;

(घ) पदविकास्तरीय पाठ्यक्रमांकरिता पाठ्यपुस्तक आणि संदर्भ ग्रंथ म्हणून कोणतेही पुस्तक विहित आणि विकसित करणे किंवा कोणतेही पुस्तक आणि मुद्रित किंवा अमुद्रित साहित्य तयार करणे किंवा तयार करविणे किंवा इतर कोणत्याही प्रकारचे अध्ययन साहित्य प्रत्यक्षपणे किंवा इतर कोणत्याही अभिकरणाच्या साहाय्याने प्रसिद्ध करणे ;

(ङ) परीक्षांना बसणाऱ्या नियमित उमेदवारांच्या आणि पुन:परीक्षार्थी उमेदवारांच्या प्रवेशाचे नियमन करणाऱ्या सर्वसाधारण शर्ती विहित करणे आणि पात्रता, उपस्थिती, सत्रातील कामगिरी यासंबंधीच्या शर्ती विनिर्दिष्ट करणे आणि त्यांची पूर्तता केल्यावर उमेदवारास अशा कोणत्याही परीक्षेला प्रवेश घेण्याचा आणि बसण्याचा हक्क असेल ;

(च) पदविकेची अंतिम परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या उमेदवारांना प्रमाणपत्रे देणे ;

(छ) शिष्यवृत्त्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावेतने, पदके, बक्षिसे आणि इतर पारितोषिके सुरू करणे व ते प्रदान करणे आणि त्यासाठी शर्ती विहित करणे ;

(ज) न्यासाकडून इच्छापत्रित दान, देणग्या व दाननिधी आणि कोणत्याही मालमत्तेची किंवा तिच्यातील हितसंबंधाची किंवा तिच्यातील हक्कांची इतर हस्तांतरणे स्वीकारणे ;

(झ) वरील खंड (ज) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही मालमत्ता, हितसंबंध किंवा हक्क धारण करणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे आणि त्यासंबंधी व्यवहार करणे ;

(ञ) विहित करण्यात येईल अशा फीची आणि शास्तीची निश्चिती करणे, मागणी करणे व ती स्वीकारणे ;

(ट) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, राज्य शुश्रूषा अधीक्षक किंवा शासनाच्या वैद्यकीय शिक्षण अधिकाऱ्यांकडून विशेष अहवाल व माहिती मागविणे आणि मंडळाने मान्यता दिलेल्या कोणत्याही पदविकास्तरीय संस्थेकडून कोणतीही माहिती मागविणे, पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यकीय शिक्षणाचा शैक्षणिक दर्जा कायम राखला जात असल्याची आणि त्यात सुधारण्यासंबंधीची सुनिश्चिती करणे ;

(ठ) मंडळाने मान्यता दिलेल्या संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या भौतिक, नैतिक आणि सामाजिक कल्याणाला चालना देण्यासाठी उपाययोजनांची शिफारस करणे आणि त्यांच्या निवासाच्या आणि अनुशासनाच्या शर्ती विहित करणे ;

(ड) कलम २१ च्या पोट-कलम *(७)* मध्ये नमूद केलेल्या पदांव्यतिरिक्त विनियमांनुसार कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे ;

(ढ) मंडळाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या हितासाठी भविष्यनिर्वाह निधी घटित करणे ;

(ण) मंडळाशी संबंधित वार्षिक वित्तीय विवरणपत्रास मान्यता देणे आणि वार्षिक अर्थसंकल्पाच्या मंजुरीसाठी नियामक परिषदेकडे शिफारस करणे ;

(त) विभागीय कार्यालय कोणतेही असल्यास, त्यांच्या कामकाजाची तपासणी करणे आणि त्यांचे सर्वसाधारण पर्यवेक्षण करणे आणि त्या त्या विभागाच्या लेख्यांची नियतकालिक तपासणी करणे ;

(थ) अभ्यासक्रम, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया आणि परीक्षा यांची रूपरेषा, विकास, अंमलबजावणी आणि मूल्यमापन यांच्या प्रयोजनांसाठी राज्यामधील आणि देशातील इतर राज्यांमधील किंवा भारताबाहेरील कोणत्याही अभिकरणाच्या सहयोगाने सांख्यिकी व इतर संशोधन किंवा प्रशिक्षण कार्यक्रम घेणे ;

(द) या अधिनियमाखालील आपली कामे कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा समित्यांची नेमणूक करणे ;

(ध) या अधिनियमाच्या तरतुदी परिणामकारकरीतीने अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी विनियम तयार करणे ;

(न) मंडळ, त्याच्या समित्या यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये आणि त्याखाली केलेल्या विनियमांन्वये जिची तरतूद करण्यात आली नसेल अशी केवळ मंडळ आणि त्यांच्या समित्या यांच्याच संबंधातील कोणतीही इतर बाब यांच्याशी संबंधित उप-विधी तयार करणे ;

(प) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्रदान करण्यात येतील किंवा सोपविण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करणे आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडणे ;

(फ) राज्यातील पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यकीय शिक्षणामध्ये सुधारणा करणे, त्याचा विस्तार किंवा प्रसार करणे आणि पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यक शिक्षणाचा दर्जा राखणे आणि त्यात सुधारणा करणे शक्य व्हावे, म्हणून या अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्याकरिता आवश्यक असेल अशी सर्व कार्यवाही करणे ;

(ब) संस्थांना संलग्नता, अधिस्वीकृती, समकक्षता, पात्रता देण्यासाठी आणि संलग्न किंवा अधिस्वीकृती किंवा समकक्षता किंवा पात्रता यांचे पुनर्विलोकन करण्यासाठी आणि ती रद्द करण्यासाठी विनियम तयार करणे ;

(भ) संलग्नता, अधिस्वीकृती, स्वायत्तता प्रदान करणे किंवा समकक्षता देणे याकरिता संस्थांसाठी विहित करण्यात येईल अशा फीची मागणी करणे आणि ती स्वीकारणे ;

(म) विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे ;

(यक) प्राश्निक, परीक्षक, नियामक, पर्यवेक्षक नेमणे, तसेच परीक्षा घेणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे आणि निकालांचे संकलन करून निकाल जाहीर करणे, याकरिता इतर आवश्यक कर्मचारीवर्गाची नियुक्ती करणे ;

(यख) विनियमांनुसार परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देणे ;

(यग) मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या सैद्धांतिक लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेकरिता त्यांच्या अधिकारितेतील केंद्रांची निवड करणे ;

(यघ) निश्चित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा दिनांकांना घेण्यात येणाऱ्या परीक्षांना बसलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करणे ;

(यङ) गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांची सूची तयार करणे ;

(यच) अनुचित मार्ग अवलंब केलेल्या प्रकरणांच्या बाबतीत, निर्धारित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करणे ;

(यछ) अंतिम परीक्षेसह पदविकास्तरीय पाठ्यक्रमांच्या इतर सर्व परीक्षांमधील विद्यार्थ्यांच्या आणि संस्थांच्या कामगिरीचे सर्वसाधारण मूल्यमापन करणे ;

(यज) विद्याविषयक दर्जा कायम राखण्याची खातरजमा करण्यासाठी, मंडळाने मान्यता दिलेल्या कोणत्याही पदाविकास्तरीय संस्थांकडून कोणतीही माहिती मागविणे, मंडळाने मान्यता दिलेल्या परंतु आवश्यक तो विद्याविषयक शैक्षणिक दर्जा न राखणाऱ्या पदविकास्तरीय संस्थांबाबत संबंधित शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण प्रादेशिक कार्यालय कोणतेही असल्यास, त्यांच्याकडून विशेष अहवाल व माहिती मागविणे आणि शैक्षणिक निकाल असमाधानकारक असेल आणि गंभीर स्वरूपाच्या शैक्षणिक अनियमितता आढळल्या असतील, तर अशा प्रकरणात संस्थांची मान्यता काढून घेण्यासाठी मंडळाकडे शिफारस करणे ;

(यझ) परीक्षा घेण्यासाठी शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने मान्यता दिलेल्या संस्थांकडून सहकार्याची मागणी करणे आणि परीक्षा घेण्यासाठी आवश्यक असलेल्या सोयी-सुविधा देण्यात कसूर करणाऱ्या कोणत्याही संस्थेचा विशेषाधिकार काढून घेण्याचा आदेश का काढण्यात येऊ नये, याबाबत त्यांना कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्यानंतर तिच्यामधून मंडळाचा विशेषाधिकार काढून घेणे ;

(यञ) पुढील बाबींसाठी आवश्यक असलेली कोणतीही मालमत्ता किंवा पायाभूत सुविधा निर्माण करणे, त्यांची मालकी घेणे, त्या धारण करणे किंवा भाड्याने घेणे —

(एक) मंडळाच्या कार्यालयाचे कामकाज ;

(दोन) प्रादेशिक कार्यालयाचे कामकाज ;

(तीन) मंडळाच्या अधिकारी व कर्मचारीवर्गाला निवासव्यवस्था पुरविणे ;

(यट) विद्याविषयक कार्याचे नियोजन व संनियंत्रण करणे ;

(यठ) गरजाधारित पाठ्यक्रम, स्वयंरोजगाराकरिता विशेष पाठ्यक्रम, ग्रामीण, वंचित व्यक्ती व महिला याकरिता पाठ्यक्रम प्रस्तावित करणे.

१९४७ चा ४८. (२) पोट-कलम *(१)* अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांचा वापर करताना आणि कर्तव्ये पार पाडताना मंडळ ज्या तरतुदींमुळे भारतीय शुश्रूषा अधिनियम, १९४७ अन्वये निर्धारित केलेल्या प्रमाणकांवरील प्रमाणके राखली जातील आणि ज्या तरतुदी, उक्त भारतीय शुश्रूषा अधिनियमाखालील भारतीय शुश्रूषा परिषदेने निर्धारित केलेल्या प्रमाणकांना आणि केंद्र सरकारने परावैद्यक शिक्षणासंबंधी दिलेल्या निदेशांना अनुरूप असेल केवळ अशाच तरतुदी करील.

मंडळाच्या अध्यक्षाचे अधिकार व कर्तव्ये.

**२५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींचे व त्याखाली केलेले विनियम आणि उपविधी यांचे पालन केले जात आहे याची सुनिश्चिती करणे हे मंडळाच्या अध्यक्षाचे कर्तव्य असेल आणि या प्रयोजनासाठी त्याला आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

(२) कोणत्याही निकडीच्या प्रसंगी, तात्काळ कार्यवाही करण्यात आली पाहिजे असे मंडळाच्या अध्यक्षांचे मत असेल तर अध्यक्ष, त्यास आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करील आणि त्यानंतर आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळास त्याच्या लगतनंतरच्या बैठकीत सादर करील.

(३) अध्यक्ष, विहित करण्यात येतील अशा इतर अधिकाराचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

निदेश देण्याचे शासनाचे अधिकार.

**२६.** (१) शासनाला मंडळाने कोणताही सल्ला दिलेला असल्यास, तो सल्ला विचारात घेतल्यानंतर कलम २४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसंबंधात त्यास आवश्यक वाटतील असे निदेश मंडळाला देण्याचा अधिकार असेल. मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.

(२) तसेच शासनास, मंडळाने चालविलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही गोष्टी संबंधात किंवा मंडळ चालवीत असलेल्या किंवा करीत असलेल्या किंवा चालविण्याचा किंवा करण्याचा मंडळाचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधात सूचना देण्याचा आणि त्या बाबतीतील आपली मते मंडळाला कळविण्याचा अधिकार असेल.

(३) मंडळाने शासनाची मते कळविण्यात आल्यानंतर त्यासंबंधात जी कोणतीही कार्यवाही केली असेल किंवा करण्याचे योजिले असेल, त्याबद्दल शासनाला कळवील आणि अशी समुचित कार्यवाही करण्यास जर त्याने कसून केली असेल तर त्याबाबत स्पष्टीकरण देईल.

(४) जर मंडळाने शासनाचे समाधान होईल अशा रीतीने वाजवी अवधीत कार्यवाही केली नाही तर, शासनास मंडळाकडून सादर करण्यात आलेले कोणतेही स्पष्टीकरण किंवा करण्यात आलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर या अधिनियमाशी सुसंगत असलेले व त्यास योग्य वाटतील असे, निदेश देता येतील आणि मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.

(५) निकडीच्या वेळी शासनाच्या मते तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत होईल, तर शासनास मंडळाशी आधी विचारविनिमय न करता या अधिनियमाशी सुसंगत असलेली त्यास आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करता येईल आणि केलेल्या कार्यवाहीबाबत मंडळाला तात्काळ कळवील.

(६) मंडळाचा कोणताही ठराव, आदेश किंवा कृती ही मंडळास या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा अतिक्रम करून करण्यात आली आहे असे शासनाचे मत होईल, तर शासनास लेखी आदेशाद्वारे आणि कारणे विनिर्दिष्ट करून मंडळाचा कोणताही ठराव किंवा आदेश याची अंमलबजावणी स्थगित करता येईल आणि मंडळाने जी कार्यवाही करण्याचा आदेश दिला असेल किंवा तसा आदेश दिला असल्याचे दिसून येत असेल अशी कारवाई करण्यास प्रतिबंध करता येईल.

## प्रकरण चार

## परवानगी, संलग्नीकरण, स्वायत्त दर्जा व समतुल्यता प्रदान करणे

संलग्नीकरणाच्या शर्ती.

**२७.** (१) संलग्नीकरणासाठी अर्ज करणारे व्यवस्थापन आणि ज्यांच्या संस्थेला विनिर्दिष्ट कालावधीसाठी संलग्नतेकरिता मान्यता देण्यात आली आहे ते व्यवस्थापन, पुढील अभिवचन देईल आणि त्याचे अनुपालन करील :—

(क) या अधिनियमाच्या तरतुदींचे आणि त्याखालील विनियमांचे आणि मंडळाच्या स्थायी आदेशांचे व निदेशांचे पालन करण्यात येईल,

(ख) संलग्न शाळा किंवा महाविद्यालयांसाठी एका स्वतंत्र स्थानिक व्यवस्थापन समितीची तरतूद करण्यात येईल.

(ग) अभ्यासक्रमांकरिता प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, मंडळाने आणि शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक असणार नाही,

(घ) विहित केल्याप्रमाणे इमारती, प्रयोगशाळा, ग्रंथालये, पुस्तके, अध्यापन व संशोधनासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री, वसतिगृहे, व्यायामशाळा यासारख्या योग्य व पुरेशा सुविधा असतील.

(ङ) शुश्रूषा व परावैद्यक संस्थांची वित्तीय साधने ही, तिची देखभाल व कामकाज सातत्याने चालविण्यासाठी यथोचित तरतुदी करणारी असतील.

(च) मान्यताप्राप्त संलग्न संस्थांची शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाची संख्या व अर्हता आणि वित्तलब्धी व संलग्न संस्थांच्या कर्मचारीवर्गाच्या सेवेच्या अटी व शर्ती या विहित केल्याप्रमाणे असतील आणि अभ्यास पाठ्यक्रम, अध्यापन किंवा प्रशिक्षण किंवा संशोधन कार्यक्षमतेने चालविण्यासाठी योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असतील,

(छ) संलग्नता द्यावयाच्या संस्थेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा आणि संस्थेच्या आवश्यक सुविधा, परीक्षा घेण्याकरिता व मंडळाच्या इतर कार्यक्रमांचे प्रचालन करण्याकरिता उपलब्ध करून दिल्या जातील,

(ज) या अधिनियमाच्या व विनियमांच्या तरतुदी अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून मंडळाचा अध्यक्ष व इतर अधिकाऱ्यांनी दिलेले निदेश व आदेश यांचे अनुपालन करण्यात येईल.

(झ) मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय, व्यवस्थापन कोणताही बदल किंवा परिवर्तन करण्यात येणार नाही,

(ञ) शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय संस्था बंद करता येणार नाही.

(२) मूळ मंडळाकडून "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्यात आल्याशिवाय इतर मंडळाचा भाग असलेल्या कोणत्याही संस्थेचा संलग्नतेसाठी विचार केला जाणार नाही.

परवानगी देण्याची कार्यपद्धती. **२८.** (१) भारतीय शुश्रूषा अधिनियम, १९४७ अन्वये घालून देण्यात आलेल्या मानकांचे आणि या कलमाखाली विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींप्रमाणे परावैद्यक शिक्षणासंबंधी केंद्र सरकारने दिलेल्या निदेशांचे पालन करून नवीन शुश्रूषा व परावैद्यक संस्था सुरू करण्यासाठी मंडळ परवानगी देईल. १९४७ चा ४८.

(२) नवीन संस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन ज्या वर्षाकरिता परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या आधीच्या वर्षातील शेवटच्या दिवसापूर्वी मंडळाच्या सदस्य-सचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील.

(३) मंडळ तपासणी फी प्राप्त झाल्यानंतर विहित मुदतीमध्ये तपासणी करील आणि त्याबाबतचा अहवाल राज्य शासनाला सादर करील.

(४) उपरोक्त विहित कालमर्यादेत प्राप्त झालेल्या अशा सर्व अर्जांची मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते अर्ज, त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्याअगोदर शासनाकडे पाठविण्यात येतील.

(५) मंडळाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी शासनास, शासनाची अर्थसंकल्पीय साधने, नवीन संस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनांची योग्यता आणि शुश्रूषा व परावैद्यक शिक्षणाकरिता स्थान निश्चयनाच्या संबंधात राज्यस्तरीय अग्रक्रम यासारख्या बाबी विचारात घेऊन आपल्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार त्यास उचित व योग्य वाटेल अशा संस्थांना परवानगी देता येईल.

परंतु अपवादात्मक प्रकरणात व कारणे लेखी नमूद करून शासनास नवीन शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण संस्था सुरू करण्यासाठी आलेल्या, मंडळाकडून शिफारस करण्यात न आलेला कोणताही अर्ज मंजूर करता येईल.

(७) नवीन शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण संस्था सुरू करण्यासाठी परवानगी देण्याबद्दलचा अर्ज थेट शासनाकडून विचारात घेतला जाणार नाही.

संलग्नता देण्याची कार्यपद्धती.

**२९.** (१) कलम २८ अन्वये शासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर मंडळ पोट-कलम *(२)* मध्ये दिलेली विहित कार्यपद्धती अनुसरून आणि नवीन संस्थेने निर्धारित शर्तीची पूर्तता केली आहे काय आणि केली असल्यास किती प्रमाणात केली आहे, हे विचारात घेतल्यानंतर त्या संस्थेला पहिली संलग्नता देण्याचा विचार करील. याबाबतचा मंडळाचा निर्णय अंतिम असेल.

(२) संलग्नता देण्याचा अर्ज विचारात घेण्याच्या प्रयोजनासाठी, मंडळ त्या प्रयोजनार्थ समिती घटित करील.

(३) मंडळ पुढील बाबतीत निर्णय घेईल :—

(क) संलग्नीकरणाला मान्यता द्यावी अथवा ती नाकारावी किंवा कसे ;

(ख) संलग्नता पूर्णत: अथवा अंशत: देण्यात यावी किंवा कसे ;

(ग) विषय, अभ्यास पाठ्यक्रम व प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ;

(घ) संलग्नता देताना घालून द्यावयाच्या शर्ती, कोणत्याही असल्यास.

(४) सदस्य सचिव, संलग्नतेचा अर्ज मंजूर झाला असेल तर, मंडळाच्या निर्णयाची एक प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन याला पुढील बाबींच्या माहितीसह पाठवील, त्या बाबी म्हणजे :—

(क) संलग्नतेसाठी मान्यता देण्यात आलेले विषय आणि अभ्यास पाठ्यक्रम ;

(ख) प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ;

(ग) ज्या शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली असेल अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्या शर्ती.

(५) कलम २८ मध्ये निर्दिष्ट केलेली कार्यपद्धती योग्य त्या फेरफारसह नवीन पाठ्यक्रम सुरू करणे, अतिरिक्त सोयी सुविधा नवीन विषय आणि अतिरिक्त तुकड्या याबद्दलच्या परवानगीच्या बाबतीत लागू होईल.

(६) मंडळाने संस्थेला पहिल्या वेळची संलग्नता देण्यात आल्याखेरीज संस्था कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देणार नाही.

(७) पोट-कलमे (१) ते (४) यामध्ये निर्दिष्ट केलेली कार्यपद्धती योग्य त्या फेरफारांसह, वेळोवेळी संलग्नता पुढे चालू ठेवण्याचा विचार करण्याच्या बाबतीत लागू होईल.

संलग्नता पुढे चालू ठेवणे.

**३०.** संलग्न संस्थेस ज्या अभ्यास पाठ्यक्रमासाठी संलग्नता देण्यात आली होती अशा अभ्यास पाठ्यक्रमाकरिता संलग्नता पुढे कायम चालू ठेवण्यासाठी, सर्वसाधारणपणे अशी संलग्नता समाप्त होण्याच्या दिनांकाच्या सहा महिने आधी अर्ज करता येईल. मंडळ संलग्नता देण्याकरिता लागू असेल तेथवर कलमे २७, २८ व २९ यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती अनुसरील.

संलग्नता देणे.

**३१.** संलग्न संस्थेस, अतिरिक्त अभ्यास पाठ्यक्रमांच्या संलग्नतेसाठी अर्ज करता येईल. मंडळ संलग्नता देण्यासाठी लागू असेल तेथवर कलमे २७, २८ आणि २९ यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती अनुसरील.

कायमस्वरूपी संलग्नता आणि मान्यता.

**३२.** संलग्न संस्था म्हणून किमान सहा वर्षे कार्यरत असलेल्या संलग्न संस्थेस कायमस्वरूपी संलग्नतेसाठी अर्ज करता येईल. मंडळ अर्ज विचारात घेईल आणि त्याची छाननी करील आणि संलग्न संस्थेने अर्जाच्या सर्व शर्तीची समाधानकारकपणे पूर्तता केली आहे आणि तिने वेळोवेळी विहित केलेला उच्च शैक्षणिक व प्रशासकीय दर्जा पूर्णपणे प्राप्त केलेला आहे अशी जेव्हा खात्री पटेल, तेव्हा मंडळ अशा संस्थेला कायमस्वरूपी संलग्नता देईल.

संस्थेची तपासणी करणे व अहवाल देणे.

**३३.** (१) प्रत्येक संलग्न संस्था, तिचा शैक्षणिक दर्जा व प्रशासकीय दर्जा ठरविणे मंडळाला शक्य व्हावे म्हणून त्यास आवश्यक वाटेल असे अहवाल, विवरणे आणि इतर तपशील सादर करील.

(२) अध्यक्ष, त्याबाबत त्याने नियुक्त केलेल्या एका किंवा अनेक समित्यांकडून प्रत्येक संलग्न संस्थेची दर तीन वर्षांतून किमान एकदा तपासणी करील.

संलग्नता किंवा मान्यता काढून घेणे.

**३४.** (१) जर संलग्न संस्था, कलम २७ मध्ये तरतूद केलेल्या संलग्नतेच्या शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर करील तर, मंडळास, त्या संस्थेला प्रदान केलेला विशेषाधिकार अंशत: किंवा पूर्णत: का काढून घेण्यात येऊ नये किंवा त्यात फेरबदल का करण्यात येऊ नये याबाबत व्यवस्थापनाला कारणे दाखवा नोटीस देता येईल.

(२) मंडळाने ज्या कारणांमुळे वर नमूद केलेली कारवाई करण्याचे योजिले असेल, ती कारणे ते नमूद करील आणि त्या नोटिशीची एक प्रत संस्थेच्या प्रमुखाला किंवा प्राचार्याला पाठवील. तसेच, ते नोटिशीत, ज्या कालावधीत त्या नोटिशीचे उत्तर म्हणून व्यवस्थापनाने आपले लेखी निवेदन दाखल केले पाहिजे, तो तीस दिवसांपेक्षा कमी नसेल इतका कालावधी विनिर्दिष्ट करील.

(३) असे लेखी निवेदन मिळाल्यानंतर किंवा पोट-कलम *(१)* अन्वये नोटिशीत विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर मंडळ असा विशेषाधिकार काढून घेण्याची किंवा त्यात फेरबदल करण्याची कारवाई कोणतीही असल्यास, ती कारवाई करील.

(४) मंडळ, संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन, त्याबाबतीत करावयाच्या कारवाईची शासनाकडे शिफारस करील आणि शासन, त्यानंतर त्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करील.

संस्था बंद करणे.

**३५.** (१) संस्थेच्या व्यवस्थापनास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय संस्था बंद करण्याची मुभा असणार नाही.

(२) संस्था बंद करण्याची इच्छा असलेले व्यवस्थापन, आधीच्या वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत किंवा त्यापूर्वी संस्था बंद करण्याबद्दलची कारणे नमूद असलेला आणि इमारती व साधनसामग्री या स्वरूपातील मत्ता, त्यांची मूळ किंमत, प्रचलित बाजार मूल्य आणि आतापर्यंत शासनाकडून किंवा सार्वजनिक वित्तपुरवठा करणाऱ्या अभिकरणांकडून तिने स्वीकारलेली अनुदाने यांचा तपशील नमूद असलेला अर्ज मंडळाकडे करील.

(३) असा अर्ज मिळाल्यावर, मंडळ, संस्था बंद करण्याची परवानगी देण्यात यावी किंवा कसे याबाबतचे निर्धारण आणि निश्चिती करण्यासाठी, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करवील. मंडळास, संस्थेला आवश्यक ते साहाय्य करून किंवा तिला शासनाच्या ताब्यात देऊन किंवा तिला दुसऱ्या व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करून बंदी टाळण्यात यावी किंवा कसे याचीही तपासणी करता येईल.

(४) जर मंडळाने बंदीची शिफारस करण्याचे ठरविले असेलतर, तर ते मंडळ, व्यवस्थापनाकडून वसूल करावयाच्या नुकसानीच्या किंवा नुकसानभरपाईच्या प्रमाणाबाबत आणि शासनाकडून किंवा इतर व्यवस्थापनाकडून मिळालेल्या निधीचा वापर करून निर्माण केलेल्या मत्ता आणि कमी केलेले अध्यापक व कर्मचारी यांना द्यावयाची नुकसानभरपाईची रक्कम याबाबत एक अहवाल तयार करील व तो शासनाला सादर करील.

(५) जर मंडळाने संलग्न संस्थेच्या बंदीची शिफारस केली असेल तर, शासनास बंदी आदेश काढता येईल.

(६) जर शासनाने ती संस्था ताब्यात घेण्याचे किंवा तिला दुसऱ्या व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्याचे ठरविले असेल तर, त्याबाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती ही शासनाकडून राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(७) संस्थेत आधीच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांवर बंदीचा बाधक परिणाम होणार नाही, याची सुनिश्चिती करण्यासाठी संस्था बंद करण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने अंमलात आणण्यात येईल, आणि पहिले वर्ष प्रथम बंद करण्यात येईल आणि कोणतेही नवीन प्रवेश देण्यात येणार नाहीत. टप्प्याटप्प्याने करावयाची बंदीची कार्यपद्धती ही, शासनाकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

प्रकरण पाच

## निधी, वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा

मंडळाच्या मतांचे उपयोजन.

**३६.** मंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी आणि इतर मत्ता, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने आणि त्याच्या प्रयोजनांसाठी मंडळ धारण करील आणि त्यांचे उपयोजन करील.

मंडळाचा निधी, त्याची अभिरक्षा आणि गुंतवणूक.

**३७.** (१) मंडळाचा स्वत:चा असा एक निधी असेल आणि पुढील रकमा त्यात जमा करण्यात येतील :—

(क) मंडळाने बसविलेली व वसूल केलेली फी, स्वामित्वधन व आकार तसेच शास्ती ;

(ख) शासनाने कोणतीही अनुदाने, अभिहस्तांकित रकमा, अंशदाने आणि कर्जे दिली असल्यास, ती ;

(ग) कोणतेही इच्छापत्रित दान, देणग्या व दाननिधी किंवा इतर अंशदाने असल्यास, ती ;

(घ) त्याच्याकडे निहित असलेल्या कोणत्याही कर्जरोख्यांवरील व्याज आणि त्यांच्या विक्रीचे उत्पन्न ;

(ङ) त्याच्याकडे निहित असलेल्या मालमत्तेमधून मिळणारे सर्व भाडे व नफा ;

(च) मंडळास किंवा त्याच्यावतीने मिळालेला इतर पैसा.

(२) मंडळाला, त्याच्या निधीतून विहित करण्यात येईल अशी रक्कम, भारतीय स्टेट बँकेकडे किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ च्या कलम २२ अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेले लायसन धारण करणाऱ्या, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ मध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेल्या कोणत्याही अनुसूचित बँकेकडे किंवा शासनाने यासंबंधात मान्यता दिलेल्या इतर कोणत्याही बँकेकडे, चालू किंवा ठेव खात्यात ठेवता येईल आणि उक्त रकमेपेक्षा अधिक असलेला कोणताही पैसा शासन मान्यता देईल अशा रीतीने गुंतवण्यात येईल.

१९४९ चा १०.
१९३४ चा २.

(३) यासंबंधात तयार केलेल्या विनियमाद्वारे मंडळ प्राधिकृत करील असे मंडळाचे अधिकारी अशा खात्यांचे व्यवहार चालवतील.

निधीचा सर्वसाधारण वापर.

**३८.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, मंडळाच्या निधीचा वापर या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींशी संबंधित आकार व खर्च देण्यासाठी आणि मंडळाला ज्या इतर कोणत्याही प्रयोजनासाठी या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अधिकार प्रदान करण्यात आले असतील किंवा कर्तव्ये सोपविण्यात आली असतील अशा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठीच केवळ करण्यात येईल.

वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

**३९.** (१) मंडळ, विहित करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी आणि अशा रीतीने पुढील वित्तीय वर्षाचे त्या मंडळाचे उत्पन्न व खर्च यांचा अर्थसंकल्पीय अंदाज तयार करील.

(२) मंडळ, पोट-कलम *(१)* मध्ये निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यानंतर त्याने तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजांवर विचार करील व त्याने मान्य केलेल्या स्वरूपात ते शासनास त्याच्या मंजुरीसाठी सादर करील. शासनास, अर्थसंकल्पीय अंदाजाच्या संदर्भात त्यास योग्य वाटतील असे आदेश काढता येतील व ते मंडळाला कळविता येतील. मंडळ असे आदेश अंमलात आणील.

वार्षिक लेखे व लेखापरीक्षा.

**४०.** (१) मंडळ, विहित अशा नमुन्यात आणि अशा रीतीने लेखे ठेवील.

(२) नियामक परिषदेच्या पूर्वमान्यतेने मंडळाने नियुक्त केलेला लेखापरीक्षक, मंडळाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करील.

(३) शासनास त्याला आवश्यक वाटल्यास, मंडळाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी विशेष लेखापरीक्षकाची नियुक्ती करता येईल.

(४) लेखापरीक्षक किंवा, यथास्थिति, विशेष लेखापरीक्षक आपला अहवाल मंडळाकडे सादर करील आणि त्याची एक प्रत शासनाकडे पाठवील.

(५) पोट-कलम *(२)* किंवा *(३)* अन्वये कोणतीही लेखापरीक्षा करण्यात आल्यास तिचा खर्च मंडळ करील.

तपासणी व चौकशी.

**४१.** (१) शासनास, ते निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून मंडळाने मान्यता दिलेल्या किंवा मंडळाशी संलग्न असलेल्या कोणत्याही पदविकास्तरीय संस्थेच्या इमारती, वसतिगृहे, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि साधनसामग्री यांची तसेच अशा कोणत्याही शुश्रूषा किंवा परावैद्यक संस्थांनी आयोजित केलेल्या अध्यापनाची किंवा इतर कोणत्याही कामाची आणि मंडळाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही परीक्षेची तपासणी करण्याची व्यवस्था करण्याचा; आणि कोणत्याही मंडळाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात तशाच रीतीने चौकशी करण्याची व्यवस्था करण्याचा हक्क असेल. प्रत्येक प्रकरणे, शासन, तपासणी किंवा चौकशी करण्याची व्यवस्था करण्याच्या आपल्या इराद्याची संबंधित मंडळाला रीतसर सूचना देईल आणि मंडळाला एक प्रतिनिधी नेमण्याचा हक्क असेल व अशा प्रतिनिधीस अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या वेळी हजर राहण्याचा आणि बाजू मांडण्याचा हक्क असेल.

(२) शासन, अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षाच्या संबंधात आपले म्हणणे मंडळाला कळवील आणि मंडळाचे त्यावरील मत अजमाविल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीबद्दल मंडळाला सल्ला देऊ शकेल आणि अशी कार्यवाही करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करू शकेल.

(३) तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षाबाबत मंडळाने कोणतीही कार्यवाही केलेली असेल किंवा करावयाचे ठरविले असेल तर, त्या कार्यवाहीसंबंधी ते शासनास कळवील. अशी माहिती, मंडळाच्या त्यावरील मतासह, शासन निदेश देईल अशा वेळेच्या आत सादर करण्यात येईल.

(४) निश्चित केलेल्या वेळेच्या आत, शासनाचे समाधान होईल अशी कार्यवाही मंडळाने केली नसेल त्या बाबतीत, शासनास, मंडळाने दिलेले कोणतेही स्पष्टीकरण किंवा केलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असे निदेश काढता येतील आणि मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.

मंडळाने पुरवावयाची माहिती, विवरणे, इत्यादी.

**४२.** (१) मंडळ, शासन फर्मावील असे अहवाल, विवरणे व विवरणपत्रे आणि त्याच्या कामाशी संबंधित कोणत्याही बाबींसंबंधात शासन मागवील अशी आणखी माहिती शासनास पुरवील.

(२) असा कोणताही अहवाल, विवरण किंवा विवरणपत्रे किंवा पुरविलेली माहिती विचारात घेतल्यानंतर, शासनास, या अधिनियमाशी सुसंगत असणारे, आवश्यक असे निदेश देता येतील आणि मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.

प्रकरण सहा

## पूरक व संकीर्ण तरतुदी

समितीकडे सोपविलेल्या अधिकारांचा वापर करण्याची रीत.

**४३.** या अधिनियमाखाली मंडळाने वापर करण्यासाठी त्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार त्या मंडळाने विनियमांद्वारे समितीकडे सोपवले असतील त्या अधिकारांचा वापर मंडळाने करण्यासंबंधीच्या सर्व बाबी त्या समितीकडे हस्तांतरित होतील आणि अशा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यापूर्वी, मंडळ संबंधित बाबीसंबंधातील त्या समितीचे अहवाल स्वीकारील व ते विचारात घेईल.

विनियम करण्याचे मंडळाचे अधिकार.

**४४.** (१) मंडळास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, नियामक परिषदेच्या पूर्वमंजुरीने विनियम करता येतील.

(२) विशेष करून आणि पूर्ववर्ती अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा विनियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम १९ खाली नेमण्यात आलेल्या समित्यांची रचना, अधिकार व कर्तव्ये ;

(ख) परीक्षांचे विषय व अभ्यासक्रम ;

(ग) परीक्षेसाठी, नियमित व बाह्य उमेदवारांना प्रवेश देण्याबाबतच्या सर्वसाधारण शर्ती आणि तसेच पात्रता, उपस्थिती आणि वर्तणूक यासंबंधीच्या ज्या शर्ती पूर्ण केल्यानंतर उमेदवाराला अशा कोणत्याही परीक्षेसाठी प्रवेश मिळण्याचा आणि त्या परीक्षेला बसण्याचा हक्क असेल अशा विशिष्ट शर्ती ;

(घ) कोणत्याही विषयात व एकूण परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी तसेच कोणत्याही विषयात सूट, विशेष योग्यता व प्रावीण्य मिळविण्यासाठी आवश्यक असेलेले गुण ;

(ङ) परीक्षेसाठी प्रवेश फी व त्या परीक्षांच्या संबंधातील इतर बाबींबाबत द्यावयाची इतर फी व आकार ;

(च) परीक्षा घेण्याची व निकाल प्रसिद्ध करण्याची व्यवस्था ;

(छ) प्राश्निक, परीक्षक, नियामक, पर्यवेक्षक आणि परीक्षा घेण्याकरिता आवश्यक असलेला इतर कर्मचारीवर्ग यांची नेमणूक, परीक्षासंबंधातील त्यांचे अधिकार व कर्तव्ये आणि त्यांचे पारिश्रमिक व ते प्रदान करण्याची रीत ;

(ज) प्राश्निक, परीक्षक, नियामक, पर्यवेक्षक आणि परीक्षा घेण्याकरिता आवश्यक असलेला इतर कर्मचारीवर्ग यांची अर्हता व निरर्हता ;

(झ) प्रमाणपत्रे देणे ;

(ञ) मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करणे आणि त्यांच्या सेवेच्या शर्ती ;

(ट) मंडळाच्या उक्त अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी भविष्यनिर्वाह निधी स्थापन करणे ;

(ठ) मंडळाच्या वित्तीय साधनांचे सर्व प्रकारे नियंत्रण, प्रशासन, अभिरक्षा व व्यवस्थापन ;

(ड) मंडळ ज्या तारखेपूर्वी व ज्या रीतीने त्याचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करील ती तारीख व रीत ;

(ढ) मंडळाच्या सदस्यांना व त्यांनी नेमलेल्या समिती सदस्यांना घेता येतील असे पूरक भत्ते ;

(ण) परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी अनुदानित व विनाअनुदानित संस्था यामध्ये शासकीय अधिकारी व कर्मचारीवर्गाची नियुक्ती करणे ;

(त) या अधिनियमाखाली विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी कोणतीही बाब ;

(३) या कलमाखाली केलेले कोणतेही विनियम, राज्य शासनाकडून त्यांना मान्यता देण्यात येईपर्यंत आणि मंडळाकडून ते **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईपर्यंत, अंमलात येणार नाहीत.

पहिले विनियम.

**४५.** (१) कलम ४४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी पहिले विनियम हे शासन तयार करील आणि **राजपत्रात** प्रसिद्ध करील आणि उक्त कलमान्वये नवीन विनियम रीतसर तयार करण्यात येईतोपर्यंत आणि मंजूर होईपर्यंत ते अंमलात राहतील.

(२) कलम ४४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात कोणतेही नवीन विनियम करणे इष्ट आहे किंवा पोट-कलम *(१)* मध्ये निर्दिष्ट केलेल्या किंवा कलम ४४ अन्वये मंडळाने केलेल्या कोणत्याही विनियमांमध्ये पूर्णत: किंवा अंशत: फेरबदल करणे किंवा ते निरसित करणे इष्ट आहे असे शासनास कोणत्याही वेळी वाटले तर, शासनास मंडळाशी विचारविनियम केल्यानंतर आणि **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे विनियम करता येतील किंवा अशा कोणत्याही विनियमांत संपूर्णत: किंवा अंशत: फेरबदल करता येतील किंवा ते संपूर्णपणे किंवा अंशत: निरसित करता येतील. याप्रमाणे केलेले, फेरबदल केलेले किंवा निरसित केलेले विनियम, शासन अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करील अशा तारखेपासून किंवा अशी कोणतीही तारीख विनिर्दिष्ट केलेली नसेल तर अशा उक्त अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून, अशा तारखेपूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या बाबतीत असेल ते खेरीज करून, इतर बाबतीत अंमलात येतील.

उपविधी करण्याचा मंडळाचा अधिकार.

**४६.** (१) मंडळास पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधात तरतूद करण्यासाठी या अधिनियमाशी व त्याखाली केलेल्या विनियमांशी सुसंगत असे उपविधी करता येतील.

(क) मंडळाच्या आणि तिने नेमलेल्या समितीच्या बैठकीमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती व अशा बैठकीमध्ये गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्य संख्या ;

(ख) या अधिनियमाद्वारे किंवा या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांद्वारे ज्याबाबत तरतूद केलेली नसेल अशी, केवळ मंडळाशी आणि तिच्या समित्यांशी संबंधित इतर कोणतीही बाब.

२. मंडळ पोट-कलम *(१)* खाली केलेले उपविधी **राजपत्रात** प्रसिद्ध करील.

शंका उपस्थित होईल त्याबाबतीत अर्थ उकल.

**४७.** हा अधिनियम किंवा तद्न्वये केलेले कोणतेही विनियम किंवा उपविधी यांच्या कोणत्याही तरतुदींना अर्थ लावण्याच्या संबंधात कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास ती बाब, निर्णयासाठी शासनाकडे निर्देशित करता येईल, आणि मंडळाच्या सदस्यांपैकी तीनपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी, तशी मागणी केल्यास, ती बाब याप्रमाणे निर्णयासाठी शासनाकडे निर्देशित करण्यात येईल. शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

पदविकास्तरीय शुश्रूषा संस्थांची कर्तव्ये व त्यांचे साहाय्य.

**४८.** पदविकास्तरीय सर्व संलग्न व स्वायत्त संस्था, मंडळाला या अधिनियमाखालील त्यांची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी ते मागेल अशी सर्व मदत व सहाय्य करतील.

सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृतीचे सरंक्षण.

**४९.** या अधिनियमाच्या किंवा कोणतेही विनियम किंवा उपविधी यांच्या अनुषंगाने सद्‌भावनापूर्वक केलेल्या अथवा करण्याचे अभिप्रेत किंवा उद्देशित असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल शासन, नियामक परिषद, मंडळ किंवा शासनाचे किंवा नियामक परिषदेचे किंवा मंडळाचे सदस्य किंवा कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला अथवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

मंडळाचे सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी लोकसेवक असणे.

**५०.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींनुसार, ज्यावेळी मंडळाचे सर्व सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी कृती करीत असतील किंवा कृती करीत असल्याचे अभिप्रेत असेल त्यावेळी भारतीय दंडसहितेच्या कलम २१ मधील अर्थानुसार त्यांना लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यांची सुधारणा.

**५१.** महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ हा या अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत आणि विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने नियत दिनांकापासून सुधारणा केल्याप्रमाणे अंमलात राहील. १९६६ चा महा. ४०.

निरसन

**५२.** (क) महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ याच्या कलम ११ अन्वये घटित केलेली महाराष्ट्र शुश्रूषा परिषदेची प्रत्येक समिती, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, आवश्यकतेनुसार शक्य तितक्या लवकर परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, या अधिनियमाच्या तरतुदीनुसार, पुनर्घटित करण्यात येईल. १९६६ चा महा. ४०.

(ख) नियत दिनांकाच्या लगतपूर्वी, उक्त परिषदेचा प्रबंधक, सहप्रबंधक, उपप्रबंधक आणि सहायक प्रबंधक, परीक्षा नियंत्रक, व्यवस्था विश्लेषक, वित्त अधिकारी, आणि लेखा अधिकारी व कोणताही इतर कर्मचारी या अधिनियमाच्या तरतुदीनुसार शासनाकडून त्यांची नियुक्ती होईपर्यंत उक्त अधिकारपद धारण करण्याचे चालू ठेवील.

(ग) नियत दिनांकाच्या लगतपूर्वी, उक्त परिषदेशी संलग्न असलेल्या सर्व संस्था, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये त्यांची संलग्नता काढून घेण्यात येईपर्यंत किंवा त्याचा पुनर्विचार करण्यात येईपर्यंत, या अधिनियमाखालील मंडळाशी संलग्न असल्याचे मानण्यात येईल.

(घ) नियत दिनांकाच्या लगतपूर्वी, परिषदेच्या विशेषाधिकारात मान्यता मिळालेल्या किंवा परवानगी मिळालेल्या सर्व संस्थांना या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्या अन्वये अशी मान्यता किंवा विशेषाधिकार काढून घेतला असेल, त्यावर निर्बंध घातले असतील किंवा त्यात फेरबदल केला असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या मंडळाच्या विशेषाधिकारात मान्यता मिळाली असल्याचे किंवा परवानगी दिली असल्याचे मानण्यात येईल.

(ङ) या अधिनियमाची उद्दिष्टे व प्रयोजने यांच्या संबंधात, आणि नियत दिनांकाच्या लगतपूर्वी उक्त परिषदेने स्वीकारलेली किंवा तिला मिळालेली आणि तिने धारण केलेली सर्व धर्मदाने या अधिनियमाखाली मंडळाने स्वीकारली असल्याचे किंवा त्याला मिळाली असल्याचे किंवा त्याने धारण

केली असल्याचे मानण्यात येईल आणि ज्या शर्तीवर अशी धर्मदाने स्वीकारण्यात आली होती किंवा मिळाली किंवा धारण केली होती अशा सर्व शर्ती, या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींशी त्या विसंगत असल्या तरीही, या अधिनियमाखाली विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल.

(च) या अधिनियमाची उद्दिष्टे व प्रयोजने यांच्याशी संबंधित नियत दिनांकापूर्वी पत्करण्यात आलेली व कायदेशीररित्या उक्त परिषदेच्या नावे असलेली किंवा मंडळाच्या प्रयोजनांशी संबंधित सर्व ऋणे, दायित्वे व आबंधने यांची फेड व पूर्तता मंडळाकडून करण्यात येईल.

(छ) उक्त परिषदेच्या नावे किंवा मंडळाच्या प्रयोजनासाठी किंवा त्यासंबंधात कोणतेही मृत्यूपत्रित दान, देणगी, अटी किंवा ठेव न्यास यांचा ज्यात समावेश असेल असे नियत दिनांकापूर्वी करण्यात आलेले कोणतेही मृत्युपत्र, विलेख किंवा इतर दस्तऐवज याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून जणू काही त्यामध्ये उक्त परिषदेऐवजी मंडळाचेच नाव दाखल करण्यात आले आहे असा लावण्यात येईल.

(ज) या अधिनियमाखाली मंडळाची उद्दिष्टे व प्रयोजने यांच्या संदर्भात, नियत दिनांकाच्या लगतपूर्वी कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा कोणत्याही अधिनियमितीअन्वये काढण्यात आलेल्या इतर संलेखामध्ये उक्त परिषदेबाबतचे असलेले सर्व निर्देश हे, या अधिनियमाखाली घटित केलेल्या मंडळाबाबतचे निर्देश आहेत असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल.

(झ) आदेशाअन्वये वैध रीतीने केलेली आणि नियत दिनांकाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेली प्राश्निकांची, परीक्षकांची, नियामकांची, पर्यवेक्षकांची व इतर कर्मचारीवर्गाची नियुक्ती ही या अधिनियमांन्वये आणि त्याच्या प्रयोजनांसाठी केलेली आहे असे मानण्यात येईल आणि असा अधिकारीवर्ग, या अधिनियमांन्वये नवीन नियुक्त्या होईपर्यंत पद धारण करण्याचे चालू ठेवतील व त्यांची कर्तव्ये व कामे पार पाडतील.

(ञ) मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांना नियत दिनांकाच्या लगतपूर्वी लागू असलेले सेवा विनियम हे, या अधिनियमाखाली विहित करण्यात आले असल्याचे मानण्यात येतील आणि या अधिनियमाखाली किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीज करून इतर बाबतीत, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार ते जोपर्यंत अधिक्रमित करण्यात येत नाहीत तोपर्यंत ते, अंमलात असतील.

(ट) मंडळाच्या प्रयोजनांसाठी किंवा त्यासंबंधात नियत दिनांकाच्या लगतपूर्वी कोणत्याही प्राधिकरणाने दिलेल्या किंवा काढलेल्या सर्व नोटिसा व आदेश आणि उक्त परिषदेचे आदेश किंवा परिपत्रके ही या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार ती निष्प्रभावित करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहतील आणि त्याप्रमाणे या अधिनियमाखाली ते दिले असल्याचे किंवा काढले असल्याचे मानण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५३.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली तर, शासनास **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, प्रसंगानुरूप, परंतु नियत दिनांकापासून दोन वर्षांच्या आत ती अडचण दूर करण्याकरिता त्याला आवश्यक वा इष्ट वाटेल अशी आणि या अधिनियमाच्या उद्दिष्टांशी व प्रयोजनांशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल.

(२) पोट-कलम *(१)* खाली काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## अनुसूची एक

[ कलम २, खंड (ड) पहा ]

| अ.क्र. | प्रदेशाचे नाव | प्रदेशात समाविष्ट असलेले क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मराठवाडा | औरंगाबाद, बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, परभणी आणि उस्मानाबाद जिल्हे. |
| २ | विदर्भ | अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्हे. |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | अहमदनगर, धुळे, जळगाव, कोल्हापूर, मुंबई, नंदुरबार, नाशिक, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर व ठाणे जिल्हे. |

## अनुसूची दोन

(कलम ५१ पहा)

महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ यामधील,— १९६६ चा महा. ४०.

(क) कलम २ मध्ये—

(एक) खंड (अ) मधील, "उपविधिनुसार परिषदेस" या मजकुरानंतर, पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :—

"किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम, २०१३ आणि त्याखाली केलेले उपविधी यांच्या तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळास" ; २०१३ चा महा. २३.

(दोन) खंड (इ) वगळण्यात येईल ;

(तीन) खंड (ओ) मधील, "समजण्यात आलेली" या मजकुरानंतर, पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :—

"किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम, २०१३ आणि त्याखाली केलेले उपविधी यांच्या तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळाने मान्यता दिलेली" ; २०१३ चा महा. २३.

(चार) खंड (प) मधील, "पाच" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) कलम ३ च्या, पोट-कलम (३) मधील, खंड (ब) मध्ये,—

(एक) उप-खंड (एक) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

"(एक) तीन प्रदेशांपैकी, प्रत्येक प्रदेशातून, संबंधित प्रदेशाच्या नोंदणीपुस्तकात नोंदणी केलेल्या परिचारिकांनी आपणामधून निवडून द्यावयाचा एक सदस्य" ;

(दोन) उप-खंड (दोन) वगळण्यात येईल ;

(तीन) उप-खंड (तीन) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

"(तीन) संलग्न सदस्यांच्या अधिसेवकांनी आपणामधून निवडून द्यावयाचा एक सदस्य ;" ;

(चार) उप-खंड (चार) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

"(चार) तीन प्रदेशांपैकी प्रत्येक प्रदेशाकडून संलग्न संस्थांच्या पाठनिर्देशक परिसेविका आणि चिकित्सालयीन निदेशक, यांनी आपणामधून निवडून द्यावयाचा एक सदस्य ;" ;

(पाच) उप-खंड (सात) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

"(सात) महाराष्ट्रामधील शुश्रूषा शिक्षण संस्थांसह मान्यताप्राप्त शुश्रूषा महाविद्यालये किंवा विद्यालये यांच्या प्रमुखांनी (प्राचार्य) आपणामधून निवडून द्यावयाचा एक सदस्य ;" ;

(ग) कलम १० मधील खंड (इ), (फ), (ग), (ह), (आय), (ज), (के) आणि (ल) वगळण्यात येतील ;

(घ) कलम १२ वगळण्यात येईल ;

(ङ) कलम १३ मधील, "परीक्षा मंडळाचा व" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(च) कलम १४ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (क) वगळण्यात येईल ;

(छ) कलम १५ मध्ये, पोट-कलम (६) मधील, "तसेच परीक्षा मंडळाचा" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ज) **"प्रकरण चार-प्रशिक्षण संस्थांना मान्यता देणे व त्यांचे संलग्नीकरण"** हे शीर्षक आणि कलमे २५ व २६ वगळण्यात येतील ;

(झ) कलम ३८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (ई) वगळण्यात येईल ;

(ञ) कलम ३९ मधील, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) परिषदेला, राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, या अधिनियमान्वये परिषदेने अधिकाराचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा बाबींकरिता, हा अधिनियम किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे उप-विधी तयार करता येतील ;" ;

(ट) अनुसूचीऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल :—

## अनुसूची

[ कलम २, खंड (प) पहा ]

| अ.क्र. | प्रदेशाचे नाव | प्रदेशात समाविष्ट असलेले क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मराठवाडा | औरंगाबाद, बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, परभणी आणि उस्मानाबाद जिल्हे. |
| २ | विदर्भ | अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्हे. |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | अहमदनगर, धुळे, जळगाव, कोल्हापूर, मुंबई, नंदुरबार, नाशिक, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर व ठाणे जिल्हे. |

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६